# आदिवासी विकास

## १. सीआर/६५१/अमरावती/१४

फिर्यादी हे दुर्गामाता चौक दिग्रस, जिल्हा यवतमाळ येथे रहावयास असून त्यांची बाजीराव नगर, दिग्रस, जिल्हा यवतमाळ येथे ३३०० स्के. फूट जागेवर ३ मजली इमारत आहे. सदर इमारत ही त्यांनी दिग्रस येथील आदिवासी मुलांचे वसतीगृहाचे गृहपाल श्री झाकर्डे यांना भाडे करारपत्रावर दिली आहे. त्यानुसार दरमहा रु.४७,१५०/— भाडे ठरवण्यात येवून सदर इमारत आदिवासी विभागाच्या ताब्यात देवून मुलांचे वसतीगृह सुरु करण्यात आले होते. त्यानंतर गृहपाल यांनी सदर इमारतीचे भाडे मंजूरीचा प्रस्ताव तयार करुन प्रकल्प अधिकारी कार्यालय, पुसद यांना सादर केला. प्रकल्प अधिकारी कार्यालय, पुसद यांनी सदरचा प्रस्ताव अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती यांना सादर केला. सदर प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांना आहेत.

आलोसे क्र.१ भास्कर पांडुरंग वाळिंबे, अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती यांनी फिर्यादी यांच्या इमारत भाडे प्रस्ताव आयुक्त, आदिवासी विभाग, नाशिक यांच्याकडे मंजूरीसाठी पाठविण्याबाबत रु.२५०००/— लाचेची मागणी केली. फिर्यादी यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती कार्यालयात तक्रार नोंदवली. त्यानुसार दिनांक १०/०७/१४ रोजी पडताळणी केली असता, आलोसे क्र.१ भास्कर पांडुरंग वाळिंबे, अपर आयुक्त यांनी रु.२५०००/— लाचेची मागणी करुन ती रक्कम आलोसे क्र.२ कालीदास चंद्रभान मेश्राम, कनिष्ठ लिपीक यांचेकडे देण्यास सांगीतले, असे निष्पन्न झाले. दिनांक १८/०७/२०१४ रोजी सापळयाचे आयोजन केले असता साक्षीदारांकडून रु.२५०००/— लाचेची रक्कम आलोसे क्र.२ कालीदास चंद्रभान मेश्राम, कनिष्ठ लिपीक यांना स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले.

सदरबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, फेजरपुरा पोलीस ठाणे, अमरावती शहर गु.र.क्र. ३१७८/२०१४, कलम ७, १२, १३(१)(ड) सह १३ (२) ला.प्र.का. प्रमाणे गुन्हा नोंद करून नमुद आरोपीतांना अटक करण्यात आली. सदर गुन्हयात अटक आलोसे क्र.१) भास्कर पांडुरंग वाळिंबे, अपर आयुक्त यांचे घरझाडतीमध्ये रु.९१,७८,५००/— रोख रक्कम मिळून आली.

## २. सीआर/२०८/ठाणे/१५

तक्रारदार हे कंत्राटदार असून त्यांना ठक्कर बाप्पा आदिवासी वातीसुधारयोजने अंतर्गत येणाऱ्या कामाची वर्क ऑर्डर देण्याकरिता यातील लोकसेवक अभिमन्यु सालुबा मगर, प्रकल्प अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल, जव्हार यांनी तक्रारदार यांचेकडे रु.७५,०००/— मागणी केली होती. त्या अनुषंगाने दि.२६/२/२०१५ रोजी सापळा कारवाई आयोजन केले असता लोकसेवक अभिमन्यु सालुबा मगर यांचेवतीने देवेन किशोर अंभीरे यांना तक्रारदार यांचेकडून रु.५०,०००/— लाच स्विकारताना सरकारी निवासस्थान, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार येथे रंगेहात पकडण्यात आले आहे.

लोकसेवक अभिमन्यू साळूबा मगर यांनी स्वत:च्या पदाचा गैरवापर करून कायदेशीर परिश्रमाखेरीज तक्रारदार यांच्याकडे नवीन काम देण्यासाठी व यापूर्वी दिलेल्या प्रशासकीय मान्यतेच्या छायांकीत प्रतीसाठी रु.७५०००/— मागणी करुन रु.५०,०००/— तक्रारदार यांचेकडुन श्री. देवेन अंभीरे याचेमार्फत स्विकारले म्हणुन त्यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ चे कलम ७, १३ (१)(ड) सह १३ (२) प्रमाणे तसेच श्री. देवेन किशोर अंभीरे, यांनी लोकसेवक अभिमन्यू साळूबा मगर, प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदीवासी विकास प्रकल्प, जव्हार यांचेवतीने तक्रारदार यांचेकडून रुपये ५००००/—ची लाच स्विकारुन मदत केली म्हणून त्यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ चे कलम १२, १३ (१) (ड) सह १३ (२) प्रमाणे विरूध्द जव्हार पोलीस स्टेशन गु.र.नं.ा १ /१५ अन्वये दिनांक २७/२/१५ रोजी ०२:४५ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला असून ०३:०० वाजता अटक केली आहे.